MRSDMM

MAHARSHTRA RAJYA SAHAKARI DUDH MAHASANGH MARYADIT, MUMBAI
MAHANAND DAIRY
Unit No.12,Aarey Colony,Western Express Highway, Goregaon (E),Mumbai 400 065
Tel. : 2685 6360/61, 2685 6585 Fax 2685 6780

# ENQUIRY

Ref.No.MS/6/Estate/Security Guard/2023-24/ 0168 Date :17.04.2023 19

To,
M/s, ______________________

______________________

______________________

______________________

Dear Sir,

Kindly submit your offer for the following items mentioned below. Quotations may please be sent to us on or **before Dt.24.04.2023.** Quotation received after the due date, mentioned here in, will not be considered. Quotation should be sent in sealed cover duly marked as "Quotation for Security Guard" .

| Sr. No. | Description | Offer Price Per Year (Rs.) |
|---|---|---|
| 1 | One Security Guard for the Land at Nagaon, Tal. & Dist. Thane. The contract for One Year as per Minimum Wages Act . Terms & Conditions attached herewith | |

**ENQUIRY**

**OPENING DATE 25.04.2023**

**Please mention above enquiry No. And opening date on the cover.**

Your's Faithfully

Dy.Manager ( Estate)

**ENQUIRY**

## -: ठेक्यातील अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-

१) ठेकेदारास किमान वेतन कायद्यानुसार कामगारांना वेतन, भविष्य निर्वाह निधी, बोनस इत्यादी द्यावयाचे असल्याने निविदा बोली देतेवेळी या सर्वांचा विचार करावयाचा आहे.

२) कामगार आयुक्त कार्यालयाकडून राजपत्राद्वारे वेळोवेळी किमान वेतन कायदया अन्वये होणारी संभाव्य वाढ ठेकेदाराने संपूर्ण कागदपत्रांची पुर्तता केल्यावर देय राहील. तसेच शासनाने वेळोवेळी लागू केलेले कर व इतर वैधानीक बाबी ठेकेदारास देय राहतील.

३) काही कारणास्तव दैनंदिन कामकाजामध्ये व्यत्यय आल्यास / कामकाज समाधानकारक नसल्यास पर्यायी व्यवस्थेकडून काम पूर्ण करुन घेण्याचा अधिकार दूध महासंघास राहील. पर्यायी व्यवस्थेसाठी येणारा खर्च ठेकेदाराच्या देयकातून वसुल करण्यात येईल.

४) ठेकेदाराच्या कामगाराचे काम समाधानकारक न वाटल्यास ठेकेदारास सुचना करण्याचा अधिकार व्यवस्थापनास राहील.

५)ठेकेदाराने नेमलेल्या कामागारास महासंघाच्या सेवेत सामील होण्याचे अथवा महासंघाच्या सेवेतील इतर कामगारांप्रमाणे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्याचा दावा करता येणार नाही .

६) (अ) कॉन्ट्रॅक्ट लेबर ॲक्टमधील तरतूदीनुसार कामगारांना लागू असलेल्या सर्व रेकॉर्डस ठेकेदारास अद्ययावत ठेवावे लागेल. रेकॉर्डस महासंघाच्या गोरेगांव येथील कार्यालयाच्या ठिकाणी ठेवून दूध महासंघानी अथवा शासनाच्या अधिकाऱ्यांनी मागणी केल्यावर ते ठेकेदाराने उपलब्ध करावे. मजुरासंबंधी विविध कायद्याची पूर्तता करण्याची संपूर्ण जबाबदारी ठेकेदारावर राहील.

(ब) ठेकेदाराने त्यांच्यामार्फत नेमण्यात आलेल्या कामगारांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन देणे तसेच मजूर कायद्यानुसार देय असणाऱ्या सुविधा उदा. किमान वेतन, बोनस, कामगार राज्य विमा योजना, भविष्य निर्वाह निधी योजना, गणवेश, अँकलशुज, सार्वजनिक सुट्टया, उपाहारगृह सुविधा, इ. सुविधा पुरविण्याची जबाबदारी दूध महासंघाची न राहता पूर्णत: ठेकेदाराची राहील.

MRSDMM

MAHARSHTRA RAJYA SAHAKARI DUDH MAHASANGH MARYADIT, MUMBAI
MAHANAND DAIRY
Unit No.12,Aarey Colony,Western Express Highway, Goregaon (E),Mumbai 400 065
Tel. : 2685 6360/61, 2685 6585 Fax 2685 6780

**ENQUIRY**

(क) ठेकेदाराने या करारातील कोणत्याही अटींचा भंग केल्यास एक महिन्याची पूर्व सूचना देऊन हा करार रद्द करण्यात येईल. त्यामुळे दूध महासंघाचे जे आर्थिक नुकसान होईल ते सर्व सुरक्षा अनामत रक्कमेमधून अथवा इतर कायदेशीर मार्गाने वसुल केले जाईल.

(ड) ठेकेदारास दिलेला ठेका अ-हस्तांतरणीय असेल.

७)कामगाराचा अपघात झाल्यास होणाऱ्या खर्चाची व नुकसान भरपाईची संपूर्ण जबाबदारी ठेकेदारावर राहील.

८) ठेकेदाराने नेमलेल्या कामगारानी शिस्तीचे व नियमांचे पालन काटेकोरपणे करणे आवश्यक राहील. त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन, गैरकृत्ये, चोरी होणार नाही अशी दक्षता ठेकेदारास घ्यावी लागेल.

९) ठेकेदाराने त्याच्या कामगाराचे हजेरी पत्रक दर महा देयका सोबत संपदा विभागात सादर करावयाचे आहे.

नोंदणीकृत कार्यालय : एन.के.एम. इंटरनॅशनल हाऊस, ३रा मजला, १७८,बॅकबे रेक्लमेशन,बाबुभाई एम.चिनाई मार्ग, मुंबई ४०० ०२०.
Regd. Office : N.K.M. International House,3rd Floor, 178,Backbay Reclamation, B.M. Chinai Marg, Mumbai 400 020.
Tel.: 2202 4529 Fax : 2287 4610 Gram: Cofedmilk